
ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष १४ | पुणे, बुधवार २१ फेब्रुवारी, १९६८ | अंक ४






नांगर, पंपिंग सेट, पेरणी यंत्रें, कल्टिवेटर, ऊसांचे चरक, स्लूस व्हाल्व, शेगयंत्रें यांसारख्या किर्लोस्कर यंत्रांवर महत्त्वाकांक्षी शेतकरी व बागाईतदार आपलें उत्पादन वाढविण्यासाठीं भरंवसा ठेवतात. शेती व बागाईत यांचें उत्पादन वाढविण्यांत हीं यंत्रें महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**

# विविध माहिती

**सहकारी शेतीला प्राधान्य द्या**—राष्ट्रीय सहकारी शेती सल्लागार मंडळाची बैठक दिल्ली येथे भरविण्यात आली होती. राज्य सरकारांनी सहकारी शेती संघटनांना प्राधान्य देण्यात पुढाकार घ्यावा अशी सूचना बैठकीत करण्यात आली. सध्या देशात ७,५०० सहकारी शेती संघटना आहेत, आणि त्यातील सभासदांची संख्या २ लाख आहे. संघटनेमार्फत ११ लाख एकर जमीन कसली जाते.

**अणुवीज केंद्रासाठी साह्य**—मद्रासजवळ उभारण्यात यावयाच्या अणुवीज केंद्रासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकी काही गुंतागुतीची आधुनिक यंत्रसामग्री पुरविण्याची तयारी झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारने दाखविली आहे. भारत सरकार ह्या मदतीसंबंधी विचार करीत आहे.

**प्रगत देशांना सूचना**—भारताचे उपपंतप्रधान श्री. मोरारजी देसाई दिल्ली येथे बोलतांना म्हणाले की, प्रगत देशांनी विकसनशील देशांना आपली निर्यात वाढविता यावी म्हणून मदत करणे अगत्याचे आहे. अशी मदत न मिळाली तर विकसनशील देशांना निर्यात वाढविणे कठीण जाईल आणि परिणामी परदेशांची कर्जे फेडण्याचे काम अधिकच बिकट होईल.

**पंजाबांत ट्रॅक्टरचा कारखाना**—पंजाब सरकारने एक ट्रॅक्टरचा कारखाना काढण्याचे ठरविले आहे. त्याशिवाय शेतीच्या उपयोगी पद्धतील अशा प्रकारची छोटी हेलिकॉप्टर्स बनविण्याचा एक कारखानाही सरकार काढणार आहे. ह्या कारखान्यात मुख्यतः निवृत्त सैनिकांना काम देण्यात येईल. कारखाना ६ महिन्यांत उत्पादन करू लागेल.

**यांत्रिक हत्यारांची निर्यात**—हिंदुस्थान मशीन टूल्स आणि सीलोनचे पोलाद कार्पोरेशन ह्यांच्यात झालेल्या कराराप्रमाणे यांत्रिक हत्यारांची निर्यात सीलोनला करण्यात येणार आहे. सीलोनमध्ये यांत्रिक हत्यारांचा एक कारखाना काढण्याच्या वाटाघाटी उभय पक्षांत सध्या चालू आहेत. त्यातील हे पहिले पाऊल आहे.

**बिहारमध्ये औषधांचा खप अधिक**— भारतात बिहार राज्यात ॲलोपाथी पद्धतीच्या औषधांचा खप सर्वांत अधिक होतो. पण अशा प्रकारच्या औषधांची निर्मिती मात्र राज्यात २० लाख रुपये किंमतीचीच होते. दरसाल खप मात्र १५ ते २० कोटी रुपयांच्या जवळपास आहे. अर्थात इतर राज्यांकडून बिहारला पुरवठा घ्यावा लागतो.

**पाकिस्तान व रशिया जोडणारा नवा रस्ता**—पाकिस्तान व रशिया ह्यांना जोडणारा खुष्कीचा नवा मार्ग बांधण्याचे उभयता देशांच्या सरकारांनी ठरविले आहे. पश्चिम पाकिस्तानातील पेशावर आणि क्वेट्टा ह्यांमधून जाणारा संकल्पित रस्ता उझबेकिस्तानमधील दोन मोठ्या शहरांना जोडण्यात येईल. मार्गाची तपशीलवार आखणी लवकरच होईल.

**रामायणावरील नाटक**—मॉस्कोमधील मुलांच्या नाट्यगृहांत रामायणावर आधारलेले एक नाटक भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या प्रसंगी दाखविण्यात आले. हे नाटक प्रथम १९६० साली रंगभूमीवर करण्यात आले. तेव्हापासून सतत ८ वर्षे ते रशिआतील लाखो बालकांना आकर्षित करीत आहे. प्रावदा ह्या पत्राने त्यावर एक खास लेख प्रसिद्ध केला होता.

**लष्करी महत्त्वाचा रेल्वेरस्ता**—भारत-पाकिस्तानच्या पश्चिमेकडील सरहद्दीनजीक जेसलमीर ते पोकारां असा नवा लष्करी महत्त्वाचा रेल्वेमार्ग बांधण्यात आला आहे. वालुकामय प्रदेशातील ह्या रस्त्याची लांबी १५० किलोमीटर असून तो बांधण्यासाठी २.५ कोटी रुपये खर्च आला. बांधकाम एका वर्षात पूर्ण करण्यात आले.

**पोलाद कारखान्यांना २२ कोटी रु. तोटा**—आर्थिक मंदीचा सरकारी पोलाद कारखान्यांना चांगलाच तडाखा बसला आहे; त्यांना एप्रिल १९६७ ते डिसेंबर १९६७ ह्या नऊ महिन्यांत २२ कोटी, ३४ लक्ष रु. तोटा झाला.

**ब्रि. इं. कॉर्पोरेशनला ओव्हरड्राफ्ट**—स्टेट बँकेच्या कानपूर शाखेने ब्रिटिश इंडिया कॉर्पोरेशनला २ कोटी रु. चा ओव्हरड्राफ्ट दिला, त्यावर राज्यसभेत नापसंती व्यक्त करण्यात आली. कानपूर शाखेच्या बोर्डाचे चेअरमन श्री. विलकॉक्स हे इंग्रज आहेत आणि ते ब्रि. इं. कॉर्पोरेशनचे डायरेक्टर आहेत, म्हणून हा ओव्हरड्राफ्ट देण्यात आला, असा आरोप करण्यात आला. हा ओव्हरड्राफ्ट बँकेच्या सेंट्रल बोर्डाने मंजूर केला असून रिझर्व्ह बँकेची त्याला मान्यता आहे, असा सरकारतर्फे खुलासा करण्यात आला.

**आर्थिक वर्षाला १ नोव्हेंबरला प्रारंभ ?**—भारताचे आर्थिक वर्ष १ नोव्हेंबरपासून सुरू व्हावे, अशी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रिफॉर्म्स कमिशनची शिफारस आहे. तिचा विचार चालू असून त्याबाबत निर्णय १९६८-६९ च्या अंदाजपत्रकाचे आधी घेण्यात येईल.

**सोलापूर मिलवर सरकार ४ कोटी रु. खर्चणार**—सोलापूरची नरसिंगगिरजी गिरणी सरकारने स्वतःकडे घेतली आहे. त्या गिरणीच्या आधुनिकीकरणावर ४ कोटी रुपये खर्च करण्याचा सरकारचा विचार आहे.

**दिल्लीत दररोज नऊ लोक बेपत्ता**—दिल्लीमध्ये दररोज सरासरीने नऊ लोक बेपत्ता होतात, असे गृहमंत्री श्री. चव्हाण ह्यांनी लोकसभेत सांगितले. त्याची माहिती रेडिओवरून ध्वनिक्षेपित केली जाते आणि गॅझेटात छापली जाते.

**कॅशियर मृतावस्थेत; कॅशमध्ये तूट**—मालेगाव खरेदी-विक्री सोसायटीचे कॅशियर संघाच्या कचेरीत रात्री मृतावस्थेत आढळले. सोसायटीच्या तिजोरीत ३, ४७० रुपये कमी आहेत.

# ★ अर्थ ★

बुधवार, २१ फेब्रुवारी, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## भरपूर नफा आणि बचत ह्यांची आवश्यकता

### आर्थिक विकासासाठी पाळावयाचे पथ्य

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री. जे. जे. अंजारीआ ह्यांनी बोर्ड ऑफ मॅनेजमेंट असोसिएशनपुढे बडोदा येथे केलेल्या भाषणात आर्थिक विकासासाठी पाळावयाच्या पथ्याचे दिग्दर्शन केले आहे. ते म्हणाले की भारताच्या सध्याच्या आर्थिक अवस्थेत काही बाबी विशेष चिंता लागून राहण्यासारख्या आहेत. गेल्या एक-दोन वर्षात भांडवल गुंतवणूक जवळजवळ थंडावली आहे. बऱ्याच उद्योगधंद्यांवर मंदीची छाया पसरलेली आहे आणि एकूण अर्थ-व्यवस्थेत विस्तार पावण्याची प्रेरणा ओहोटीस लागलेली आहे. अर्थव्यवस्थेला स्थिर स्वरूपाच्या आणि भरीव प्रगतीच्या मार्गावर आणून सोडण्याचे काम दोन गोष्टींवर अवलंबून आहे. पहिली गोष्ट म्हणजे किंमती स्थिर पातळीवर राखण्यात आल्या पाहिजेत; आणि सरकारच्या द्रव्यविषयक आणि व्यापारविषयक धोरणाचा नव्याने विचार करण्यात आला पाहिजे. त्याचप्रमाणे भांडवलगुंतवणूक आणि बचत ह्यांचे नियोजन करण्यात आले पाहिजे. सध्या देशातील परिस्थिती अशी आहे की केवळ किंमती स्थिर पातळीवर राखण्याकडे लक्ष देऊन भागणार नाही. भांडवलगुंतवणुकीकडेही लक्ष देण्यात आले पाहिजे. त्याचप्रमाणे बचतीबद्दल विचार न करता अधिकाधिक भांडवल गुंतवणुकीवर भर देऊनही चालणार नाही. सार्वजनिक मालकीच्या विभागातील गुंतवणूक वाढविण्यासाठी तुटीच्या अर्थकारणाचा आश्रय घेण्यात येतो. विकासासाठी साधनसंपत्ती जमविण्याच्या कामी ह्या पद्धतीला काही कार्य करता येते ह्यात शंका नाही. पण त्यालाही काही मर्यादा आहेत. ह्या मर्यादा संपल्यावर तुटीच्या अर्थकारणाला विराम देण्यात आला पाहिजे.

साधनसंपत्तीची जमवाजमव करताना गुंतलेल्या भांडवलावर अधिकाधिक नफा मिळविण्याकडे प्रामुख्याने लक्ष देण्यात आले पाहिजे. निदान सध्याच्या आर्थिक परिस्थितीत तरी ते आवश्यक आहे. सार्वजनिक बचतीच्या द्वारा अधिक पैसा उभारण्यात आला पाहिजे. पण, हे काम अधिक कर बसवून अगर अधिक कर्ज काढून मात्र करता कामा नये. सार्वजनिक मालकीच्या विभागातील औद्योगिक संघटनांनी अधिक नफा मिळवून ते केले पाहिजे. हिंदने सार्वजनिक मालकीच्या औद्योगिक संघटनांत जवळ जवळ २,००० कोटी रु. भांडवल गुंतविलेले आहे. पण त्यापासून मिळणारा नफा फारच कमी आहे. त्या संघटना चालविणाऱ्या कारभाऱ्यांना हे एक आव्हानच म्हटले पाहिजे. कारण सार्वजनिक मालकीच्या संघटना ह्या बाबतीत जर कसोटीला उतरल्या नाहीत तर ज्या गृहीत कृत्यांवर हिंदचे आर्थिक कार्यक्रम आखण्यात आले आहेत तीच उखडल्यासारखी होतात. अलीकडे सर्व अर्थव्यवस्थाच खर्चाकडे अधिक कल असणारी झाली आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील खर्च वाढत चालला आहे. त्यांत संरक्षणावरील खर्चाचा हिस्सा बराच मोठा आहे. समाजांतील श्रीमंत वर्गाच्या जीवनात काटकसरीचा आणि साध्या राहणीचा फारसा आढळ होत नाही. उद्योगधंद्यांत आणि व्यापारांत गुंतलेला मध्यमवर्गही श्रीमंतांचेच अनुकरण करीत आहे. परिणामी बचत ही चीज दुष्प्राप्य झाली आहे. अर्थव्यवस्थेची कायम स्वरूपाची वाढ होण्यासाठी भांडवल गुंतवणुकीचा एकतर्फी विस्तार करून चालणार नाही. त्याचबरोबर बचतीचाही विस्तार होत गेला पाहिजे. आगामी अंदाजपत्रकात ह्या दोन्ही गोष्टींना उत्तेजन देण्यासाठी उपाय योजण्यात आले पाहिजेत.

---

### बड्या ब्रिटिश बँकांचे एकत्रीकरण

ग्रेट ब्रिटनमधील प्रमुख बँकांपैकी बार्कलेज आणि लॉइड्स ह्या बँकांनी आपल्या एकत्रीकरणाच्या योजनेची घोषणा केली आहे. सहाव्या अनुक्रमाची मार्टिन्स बँकहि विलिनीकरणात सामील होणार आहे. ह्यामुळे 'बिग फाइव्ह' चे रूपांतर 'बिग थ्री' मध्ये होईल, आणि ही नवी बँक म्हणजे जगातील एक मातब्बर बँक बनेल. वेस्टमिन्स्टर आणि नॅशनल प्रॉव्हिन्शिअल बँक ह्यांचे एकत्रीकरण आधीच झालेले आहे. म्हणजे, मिडलंड बँक हीच फक्त पहिल्याप्रमाणेच स्वतंत्र राहणार आहे. एक होल्डिंग कंपनी स्थापन करून तिने बार्कलेज, लॉइडस आणि मार्टिन्स ह्या तीनही बँकांचे भाग खरीदावे, असे ह्या विलीनीकरणाच्या योजनेचे स्वरूप आहे. ह्या विलीनीकरणामुळे ग्रेट ब्रिटनमध्ये व बाहेरही बँकिंगचे सुसूत्रीकरण होऊन तीनही बँकांच्या भागीदारांना त्याचप्रमाणे जनतेलाही ते हितावह होईल असे बँकांचे म्हणणे आहे. सरकारी मॉनॉपोलीज कमिशनची मान्यता मिळाल्यावरच पुढची पावले टाकली जातील. त्याला सुमारे सहा महिने लागतील.

## मॅनेजिंग एजन्सी संपुष्टात आणण्यासाठी दिलेली नुकसानभरपाई करपात्र नाही

अशोक-लेलंड लि.ने मॅनेजिंग एजन्सी संपुष्टात आणण्यासाठी २·५ लक्ष रु. नुकसानभरपाईदाखल दिले, ते धंद्याला आवश्यकच असल्यामुळे ती रक्कम इनकम टॅक्सला पात्र नाही, असे मद्रास हायकोर्टाच्या डिव्हिजन बेंचने ठरविले आहे.

अशोक-लेलंड लि.ने कार बिल्डर्स लि. ह्या प्रायव्हेट कंपनीला करार करून मॅनेजिंग एजंट नेमले होते. धोरण म्हणून अशोक-लेलंड लि.ने १९५४ साली मॅनेजिंग एजन्सीचा करार संपुष्टात आणण्याचे ठरविले आणि नुकसानभरपाईदाखल २·५ लक्ष रु. दिले. १९५४ साली अशोक-लेलंड लि.ने ऑस्टिन मोटरगाड्या जुळविण्याचे बंद केले होते आणि लेलंड मालवाहू वाहने तयार करण्यापुरतेच आपले उत्पादन मर्यादित केले होते, त्यामुळे मॅनेजिंग एजन्सी संपुष्टात आणण्याचा निर्णय घ्यावा लागला होता.

मॅनेजिंग एजन्सी संपुष्टात आणल्यामुळे अशोक-लेलंड लि.चा पुढील वर्षातील खर्च कमी झाला आणि जादा भांडवल जमा होण्यास मदत झाली. ह्या कारणास्तव ही रक्कम एकूण प्राप्तीमधून वजा घालण्यास इनकम टॅक्स अधिकाऱ्याने संमती दिली नाही. असिस्टंट कमिशनरने इनकम टॅक्स अधिकाऱ्याचा हुकूम योग्य ठरवला. नुकसानभरपाईच्या ह्या रकमेमुळे अशोक-लेलंडला कायम स्वरूपाचा कोणताही फायदा झालेला नाही; त्यामुळे धंदाही वाढलेला नाही, असे इनकम टॅक्स अपेलेट ट्रायब्यूनलने ठरविले, आणि हायकोर्टाकडे हे प्रकरण सोपविण्यात आले. "ही रक्कम देऊन मॅनेजिंग एजन्सी संपुष्टात आणणे धंद्याच्या दृष्टीने आवश्यक झाले; धंद्यातील अडचण दूर करण्यासाठी ती रक्कम खर्च करावी लागली. कार बिल्डर्सची मॅनेजिंग एजन्सी चालू ठेवली असती, तर धंद्यात व्यत्यय आला असता. म्हणून, ही रक्कम खर्ची टाकणे योग्य होते; प्राप्तीमधून ती वजा घालणेच श्रेयस्कर आहे." असे म्हणून हायकोर्टाच्या डिव्हिजनल बेंचने अशोक-लेलंड लि.ला न्याय दिला.

---

## गाईंच्यामुळे विमानाचे सात लक्ष रु. नुकसान

सांताक्रूझ विमानतळावर एअर इंडियाच्या बोईंग ७०७ विमानाखाली दोन गाई चिरडल्या गेल्या, त्यामुळे विमानाची जी दुरुस्ती करावी लागली, तिला सात लक्ष रु. खर्च आला. ही दुरुस्ती ४८ तासांत करण्यात आली; नादुरस्त भागांच्या जागी नवे भाग घालण्यात आले. हा अपघात घडला, तेव्हा विमान नुकतेच निघाले होते व त्याची गती ताशी १६५ मैलांची होती.

---


तारेचा पत्ता "मॉर्गेज" मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७ उपकार्यालय दूरध्वनी क्र. २५१५२७

### मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक लि., मुंबई

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, डुगल रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५९ कोटी येणे आहेत.


नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले, व्यवस्थापक

ये. स. बोरगांवकर कार्यकारी संचालक



महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा.



४, ६ व ८ बैली

फाळ व सुटे भाग

तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —

विश्रामबाग - सांगली ( महाराष्ट्र )

### रांची आणि दुर्गापूर कारखान्यांना अपुरे काम

रांची येथील भारी यंत्रसामग्रीच्या आणि दुर्गापूर येथील खाण यंत्रसामग्रीच्या कारखान्यांची संपूर्ण उत्पादनक्षमता अद्याप वापरण्यात येत नाही. ती संपूर्णपणे वापरण्यासाठी काय उपाययोजना करावी हे सुचविण्यासाठी रशियन तज्ज्ञांचे एक मंडळ भारतात आले आहे. रांची येथील कारखान्यात मुख्यतः पोलादाच्या कारखान्याची यंत्रसामग्री तयार करण्यात येते. पण ह्या कारखान्याच्या मालाच्या मागणीत वाढ होत नाही. १९७०–७१ पर्यंत पुरतील इतक्याच मागण्या कारखान्याकडे नोंदण्यात आल्या आहेत. त्यामुळे कारखान्याच्या विस्ताराच्या योजना अंमलात आणाव्या की नाही, असा प्रश्न उभा राहिला आहे. अशा परिस्थितीत दोन्ही कारखान्यांच्या मालांत विविधता आणण्याचा विचार होत आहे. भारतात मागणी नसल्यामुळे रशियाला उपयुक्त असा माल तयार करण्याचे घाटत आहे.

---


### पश्चिम जर्मनीत हिंदी कामगारांना संधी

पश्चिम जर्मनीतील कामगार संघटनांचे चार प्रतिनिधी भारताला आले होते. जर्मनीतील कामगार संघटनांविषयी माहिती सांगताना ते म्हणाले की एका उद्योगधंद्यासाठी एकच कामगार संघटना असते. राजप्रतिनिधी, सैनिक आणि कचेऱ्यांतील नोकर ह्यांनाही कामगार संघटनांचे सभासद होता येते. मात्र सैनिकांना संप करण्याचा हक्क नसतो. पश्चिम जर्मनीत हिंदी कामगारांना रोजगार मिळण्याची चांगली संधी आहे. पण, त्यासाठी उभयता देशांत योग्य तो करार करण्यात आला पाहिजे. पश्चिम जर्मनी मधील २·२ कोटी कामगारांपैकी १० लाख कामगार बाहेरच्या देशांतून आलेले आहेत. इटली, ग्रीस, तुर्कस्थान, दक्षिण कोरिआ, युगोस्लाव्हिआ, इत्यादी देशांतून ते आलेले आहेत. परंतु त्यांच्यांत व जर्मन कामगारांत भेदभाव करण्यात येत नाही.

---

### परतणाऱ्या सैनिकांशी कसे वागावे ?

व्हिएटनाममधील युद्धात अमेरिकन सैनिक बहुसंख्येने असले तरी दक्षिण कोरिआ, ऑस्ट्रेलिया, फिलिफाइन्स, इत्यादी देशांच्याही काही तुकड्या उत्तर व्हिएटनामशी लढत आहेत. काही ऑस्ट्रेलियन सैनिक आता परत मायदेशी येणार आहेत. ते परतल्यावर त्यांच्याशी कसे वागावे ह्यासंबंधी ऑस्ट्रेलियन स्त्रियांना सूचना देण्यात आल्या आहेत. कारण काही स्त्रियांचे पती, मुलगे, अगर मित्र ह्या सैनिकांत आहेत. सैनिकांच्या वाटेवर स्त्रियांनी उभे राहू नये, रेंगाळू नये, त्यांना मद्याच्या बाटल्या दाखवू नयेत त्याचप्रमाणे परतलेले सैनिक जर खुर्च्या, मऊ उशा, अगर स्त्रियांकडे एकसारखे रोखून पाहू लागले तर त्यांना काही बोलू नका, सैनिक काही व्हिएटनामी शब्दप्रयोग स्वतःशीच बडबडेल तर तिकडे दुर्लक्ष करा, अशा ह्या सूचना आहेत.

## काथ्याच्या धंद्याला मंदीने पछाडले

हिंदमधील काथ्याचा धंदा मुख्यत: केरळमध्ये केंद्रित झालेला आहे. गेल्या काही महिन्यात ह्या धंद्याला मंदीला तोंड द्यावे लागत आहे. काथ्याच्या वस्तू तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल आणि मजुरी ह्यांचे दर वाढले आहेत. त्याचा परिणाम होऊन तयार मालाच्या किंमती अर्थातच फुगल्या आहेत. हा माल परदेशांत निर्यात करण्यात येतो. किंमती वाढल्यामुळे आणि कृत्रिम धाग्यापासून बनविलेल्या मालाची स्पर्धा जाचक झाल्यामुळे काथ्याच्या मालाचा परदेशीय बाजारपेठांत उठाव होणे कठीण होत आहे. निर्यात मालापैकी ७० टक्के माल पौंडाच्या कक्षेतील देशांना पाठविण्यात येतो. ब्रिटनच्या पौंडाचे अवमूल्यन करण्यात आल्यापासून भारतीय रुपयांतील प्राप्ती १४·३ टक्क्यांनी खाली घसरली आहे. भारतातून दरसाल सरासरी १३ कोटी रुपयांचा काथ्याचा माल निर्यात करण्यात येतो. परदेशीय बाजारपेठांत जोराची स्पर्धा होऊ लागल्यामुळे येत्या एक-दोन वर्षात निर्यात बरीच कमी होऊ लागेल अशी चिन्हे दिसत आहेत. ह्या परिस्थितीचा विचार करून केरळ राज्य सरकारने धंद्याला सावरून धरण्यासाठी ५ वर्षांची एक योजना तयार केली आहे. योजनेत ५ वर्षांच्या अवधीत धंद्यासाठी १५ कोटी रुपयांची मदत देण्यात येणार आहे. काथ्याच्या धंद्यात सुमारे १० लाख कुटुंबे राबत असतात. धंद्यावर मंदी पसरली तर त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न अवघड होऊन बसेल. धंद्यात गुंतलेल्या माणसांची कायमची सोय करण्याच्या दृष्टीने निर्यातीबरोबरच अंतर्गत बाजारपेठेचा विस्तार करण्याचे कार्यही हाती घेण्यात आले पाहिजे. अंतर्गत खप वाढला तरच धंद्याला स्थैर्य येण्याची शक्यता आहे.

---

## हिंसक चळवळीमुळे झालेले नुकसान

भारतात अलीकडे हिंसक चळवळीचे प्रमाण वाढत चाललेले आहे. अशा प्रकारच्या चळवळीत खवळलेले लोक सार्वजनिक मालमत्तेची हानी करून आपला राग व्यक्त करतात. भारत सरकारने रेल्वेच्या नुकसानीचा अंदाज घेण्यासाठी खास कमिटी नेमली होती. कमिटीने जमविलेल्या माहितीवरून असे आढळून आले आहे की, हिंसक चळवळीमुळे रेल्वे मालमत्तेचे ३ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यांपैकी १.५३ कोटी रुपयांचे नुकसान दंगलीमुळे आगगाड्या बंद कराव्या लागल्या म्हणून झाले आहे. दक्षिण भारतात हिंदी भाषेविरुद्ध झालेल्या दंग्यात रेल्वेची ५७ लाख रुपयांची हानी झाली. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमधील बंदच्या पुकाऱ्याने ६८ लाख रुपयांचे नुकसान झाले. आंध्रमध्ये पोलाद कारखाना काढण्याविषयी झालेल्या दंगलीत रेल्वेखात्याला २३·५५ लाख रु. भुर्दंड सोसावा लागला.

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : ९, बँक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.
: विभागीय कचेरी : महाल नागपूर.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,७२,४२,००० |
| ठेवी | ... रु. | ५०,९५,६३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,०६,६५,९६,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. यु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

### नेहरूंची शिकवण मानली गेली नाही.


अन्नमलायी विद्यापीठात पं. जवाहरलाल नेहरू ह्यांच्या शिकवणुकीसंबंधी श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार ह्यांनी व्याख्यानमाला गुंफली. श्री. अय्यंगार आपल्या भाषणात म्हणाले की आर्थिक विचारात पं. नेहरूंनी दोन बाबतीत भर टाकली. आर्थिक जीवन योजनाबद्ध करण्याचा त्यांचा विचार आणि राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यामुळेच केवळ आर्थिक भरभराट होणार नाही ही जाणीव. आधुनिक उत्पादनतंत्राचा वापर करून दारिद्र्य नाहीसे करण्याचा त्यांचा हेतू होता. परंतु हे कार्य करण्यासाठी लागणारी कारभारयंत्रणा उभारणे त्यांना जमले नाही. पुष्कळदा कामे करण्यासाठी योग्य माणसांची निवडही त्यांना करता आली नाही. त्यामुळेच समाज विकास योजनांना ज्या प्रमाणात यश यावयास पाहिजे होते तितके आले नाही. पं. नेहरूंनी सतत काबाडकष्ट करण्यावर नेहमीच भर दिला. पण लोकांवर त्याचा काही परिणाम झाला नाही. औद्योगिक संघटनांतील कामगार आणि सुशिक्षित लोक दोन्ही वर्गांनी त्यांच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही. उलट उत्पादनात घटच होत गेली; आणि आज अशी परिस्थिती उत्पन्न झाली आहे की, सर्वांचीच उपभोगाची लालसा वाढलेली असून उत्पादन वाढविण्याकडे आणि बचत करून गुंतवणूक करण्याकडे कोणाचेच फारसे लक्ष राहिलेले नाही. ह्याचाच अर्थ असा की देशाच्या हितासाठी काम करण्याचा उत्साह लोकांत उत्पन्न करण्यात यश आलेले नाही. देशातील साधनसामग्री, उत्साह आणि बुद्धी ह्यांना योग्य वळण लावल्यास १५ वर्षांच्या अवधीत भारत हा एक मोठा उद्योगप्रधान देश होऊ शकेल ह्याविषयी शंका घेण्याचे कारण नाही.

---

### रेल्वेचे साहित्य खरेदी करण्याची तयारी

रशिआचे पंतप्रधान नुकतेच भारतात येऊन गेले. त्यांनी पंतप्रधान श्रीमती गांधी ह्यांच्याशी झालेल्या वाटाघाटीत भारतात तयार होणारे रेल्वेचे सामान विकत घेण्याची तयारी दाखविली आहे. येत्या पाच वर्षांत भारतात तयार करण्यात येणारे रेल्वेचे सर्व रूळ आणि डबे घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. रशिआच्या मदतीने उभारण्यात आलेल्या भिलाई येथील पोलाद कारखान्यात तयार होणाऱ्या मालाचा त्यामुळे उठाव होईलच. परंतु भारतामधील इंजिनिअरिंगच्या धंद्याला सध्या जी मंदी आली आहे ती दूर करण्यासही काही प्रमाणात साह्य होईल. रशिआ आणि भारत ह्यांच्या सहकार्याने नवीन औद्योगिक संघटना उभारण्याचा विचार करण्यासाठी रशिअन तज्ज्ञांचे एक मंडळ सध्या भारतात आले आहे. अशा सहकार्यामुळे भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमाची रशिआच्या कार्यक्रमाशी सांगड घातली जाईल.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

चवदार पिठासाठी

पिठाच्या चक्क्या




•बॉल बेअरिंग बसविलेल्या
•मजबूत बांधणी
•अद्यावत् यंत्र योजना
•साईज १४", १६", १८"

उत्पादक -
भिडे अँड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?

### पतिपत्नींच्या एकत्रित उत्पन्नावर कर

प्रत्यक्ष करासंबंधी नेमलेल्या कारभार सुधारणा मंडळाने अशी सूचना केली आहे की करआकारणीसाठी पतिपत्नीचे उत्पन्न एकत्रित धरण्यात येऊन त्यावर आकारणी करण्यात यावी. कर चुकविण्याची पळवाट ह्याशिवाय पक्की बंद होणार नाही असे मंडळाचे मत आहे. मंडळाला असे आढळून आले आहे की बऱ्याच वेळा पतीने मिळविलेली कमाई पत्नीने मिळविलेली अशी दाखविण्यात येते आणि तीवर कर आकारला जात नाही. कर-आकारणीसाठी पतीचे व पत्नीचे उत्पन्न वेगवेगळे धरण्याची भारतामधील सध्याची पद्धत इतर कोठल्याही देशांत नाही, इकडे मुद्दाम लक्ष वेधण्यात आले आहे. स्वतःच्या नावावर असलेली जिंदगी आणि उत्पन्न ह्याबरोबरच ज्या मालमत्तेपासून फायदा मिळतो तीही करपात्र मिळकतीत दाखविण्याची सक्ती करावी, अशीही सूचना मंडळाने केली आहे.

---

### परस्परांच्या संमतीने घटस्फोट

पतिपत्नींची संमती असेल तर घटस्फोटाला परवानगी देणाऱ्या एका कायद्याच्या मसुद्याला ब्रिटनच्या कॉमन्स सभागृहाने तत्त्वतः मंजुरी दिली आहे. विवाहाने बांधल्या गेलेल्या जोडप्याला वैवाहिक जीवन एकत्र कंठणे निखालस अशक्य झाले, तर उभयतांच्या संमतीने घटस्फोट घेण्याची सोय ह्या कायद्यात करण्यात आली आहे. अशा वेळी दोन वर्षे वेगळे राहिल्यावर घटस्फोट मिळू शकेल. परंतु घटस्फोटाला एका पक्षाचा विरोध असल्यास ५ वर्षे वेगळे राहून नंतर घटस्फोट मिळू शकेल. हा कायदा सभागृहात मंजूर होईलच असे मात्र नाही. कारण, सरकारने ह्या बाबतीत आपली भूमिका अद्याप स्पष्ट केलेली नाही. सरकार अजून तटस्थच आहे. ब्रिटनमधील घटस्फोटाचा कायदा आणि प्रत्यक्ष परिस्थिती ह्यांत फार तफावत असल्याचे कायदेपंडितांनीही मान्य केलेले आहे.

---

### परदेशांना मदत करण्यासाठी मागणी

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन ह्यांनी आशियातील देशांना मदत करण्यासाठी म्हणून ७०·९ कोटी डॉलर्सची शिफारस कॉंग्रेसकडे केली आहे. ह्या मदतीपैकी काही मदत दक्षिण आशियातील देशांना व पश्चिम आशियातील देशांना देण्यात यावयाची असली, तरी बराच मोठा हिस्सा भारताला व पाकिस्तानला मिळावयाचा आहे. भारताला देण्यात येणाऱ्या मदतीपैकी निम्म्याहून अधिक मदत खताची व इतर शेतीविषयक पदार्थांची आयात करण्यासाठी वापरण्यात यावयाची आहे. भारतात चालू शेतीच्या हंगामात मुबलक पीक आले असल्याने तो देश आर्थिक आरोग्य झपाट्याने साध्य करू शकेल आणि त्यामुळे समृद्ध अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया घालण्याच्या कामी त्याला यश देईल, अशी आशा प्रे. जॉन्सन ह्यांनी व्यक्त केली आहे.

Statement about ownership and other particulars about newspaper 'ARTHA' to be published in the first issue every year after last day of February.

FORM IV

( See Rule 8 )

1. Place of publication 823, Shivajinagar, Poona 4
2. Periodicity of its publication — Fortnightly
3. Printer's name — S. V. Kale.
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
4. Publisher's name — S. V. Kale
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
5. Editor's name — S. V. Kale
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital — S. V. Kale 823, Shivajinagar, Poona 4

I, Shripad Vaman Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 21-2-1968

S. V. Kale
Signature of Publisher.


सन १९६७ मध्ये
ठेवीत १५ टक्के वाढ

| | |
|---|---|
| वसूल मांडवल | : रु. १२·८४ लाख |
| राखीव निधी | : रु. ९·३२ लाख |
| ठेवी | रु. ६८२·७३ लाख |
| गुंतवणूक | : रु. २०६·३४ लाख |
| कर्जव्यवहार | : रु. ३७६·४३ लाख |

शाखा २९
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
( स्थापना–१९३६ )
मुख्य कचेरी–सातारा

### लँड ॲक्विझिशन कायदा कायदेशीर ठरला
### सुप्रीम कोर्टाचा निवाडा

लँड ॲक्विझिशन (अमेंडमेंट अँड व्हॅलिडेशन) ॲक्ट, १९६७ ला सुप्रील कोर्टाने तीन विरुद्ध दोन अशा बहुमताने मान्यता दिली आहे.

मध्यप्रदेशचे राज्य वि. शर्मा ह्यामध्ये सुप्रीम कोर्टाने असा निवाडा केला होता, की सार्वजनिक कामासाठी एखादी जागा ॲक्वायर करून, त्यातून लागेल त्याप्रमाणे वेळोवेळ जरूरीप्रमाणे जागा घेत राहणे लँड ॲक्विझिशन ॲक्टाचा ६ व्या कलमाच्या वास्तव अर्थाला धरून नाही. ४ थ्या कलमाप्रमाणे मोठी जमीन सार्वजनिक कामासाठी पाहिजे आहे असा जाहीरनामा काढल्यावर त्यातला लहानसा भाग ६ व्या कलमाखाली घेतला, तरी मूळ जाहीरनामा तेथेच संपतो; पुनः नव्याने जाहीरनामा काढून आणि हरकती मागवून झाल्याखेरीज त्यापैकी दुसरी जागा ॲक्वायर करता येणार नाही, असे कोर्टाने ठरविले होते. ह्या निवाड्यामुळे अडचणी निर्माण झाल्या; तेव्हा राष्ट्रपतींनी २०–१–६७ रोजी ऑर्डिनन्स काढला, त्याचे पुढे पार्लमेंटच्या कायद्यात रूपांतर करण्यात आले. त्याने सुप्रीम कोर्टाचा उपरिनिर्दिष्ट निवाडा रद्दबादल ठरविला.

उदयराम शर्मा आणि इतर जमीनधारक ह्यांच्या दिल्लीच्या युनियन टेरिटरीच्या हद्दीत जमिनी आहेत. त्यांनी सुप्रीम कोर्टाकडे रिट पिटिशन करून हा दुरुस्तीचा कायदा बेकायदा ठरविण्यात यावा, अशी मागणी केली. आमच्या जमिनी सरकार अक्वायर करीत असल्याने आमच्या मूलभूत हक्कांवर गदा येत आहे, असे त्यांनी आपल्या अर्जात म्हटले होते. सरन्यायाधीश व इतर दोघे न्यायाधीश ह्यांनी हा अर्ज फेटाळून लावला; तर इतर दोघा न्यायाधीशांनी स्वतंत्र निकालपत्र लिहिले. परिणामतः, दुरुस्तीचा कायदा कायदेशीर ठरला.

---

### कुटुंबनियोजन करणारांनाच सरकारी जमीन मिळणार

आपल्या कुटुंबीयांची संख्या मर्यादित ठेवणारांनाच १५ ऑगस्ट, १९६८ नंतर सरकारी जमीन मिळू शकेल, असा नवा नियम करण्यात आला आहे. भूमिहीन लोक, लष्करी नोकरदार, सुवर्णकार, स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेले, सहकारी फार्मिंग सोसायट्या, इत्यादींना सरकार पडीक जमीन लागवडीसाठी देत असते. हे सर्व पूर्वीप्रमाणेच चालू राहील; फक्त त्यांनी तीन जिवंत अपत्यांपुरतीच कुटुंबीयांची संख्या मर्यादित ठेवली पाहिजे. सध्याच तिनापेक्षा जास्त अपत्ये असतील, तर ती संख्या वाढू देता कामा नये. ही मर्यादा पुढे ओलांडली गेली, तर दिलेली जमीन परत सरकारकडे जाईल.

---

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**


लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'

किंमत ५० पैसे. २०–२–६७ रोजी प्रसिद्ध झाले.

**अधिक** धान्योत्पादन!
**अधिक** फायदा!!
**अधिक** बचत!!!
यांसाठी

किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स

यांचीच निवड आवश्यक आहे....
कारण, अत्यंत कार्यक्षम व बिनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिने, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यास उपयुक्त आहेत.
किर्लोस्कर एंजिने चालविण्यास लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सना लागणाऱ्या खर्चाच्या मानाने खूप कमी येतो.



किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
रजि. ऑफिस-एल्फिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत).

### प्रवाशांची संख्या कमी करण्यासाठी कर

अमेरिकेत सरकारने युरोप आणि आशिया खंडात प्रवासासाठी जाणाऱ्या हौशी पर्यटकांवर खास कर बसविण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेतून बाहेर जाणाऱ्या डॉलर्सचा प्रवाह मर्यादित करण्यासाठी हा उपाय योजण्यात आला आहे. ह्या वर्षी अमेरिकेला परदेशी देण्याघेण्याच्या व्यवहारांत ३०० कोटी डॉलर्सची तूट येण्याची शक्यता आहे. ती तूट भरून काढण्यासाठी एक तातडीचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. परदेशी जाणाऱ्या प्रवाशांवर खास कर बसवून ही तूट ५० कोटींनी कमी करण्याचा प्रे. जॉन्सन ह्यांचा इरादा आहे. मजेसाठी परदेशी जाणाऱ्या अमेरिकन प्रवाशांच्या विमानांच्या व बोटींच्या तिकिटावर ५ टक्के अधिक कर आकारण्यात येणार आहेत. हा कर १९६९ च्या आक्टोबरपर्यंतच आकारण्यात येणार आहे. त्याला कॉंग्रेसची संमति लागते.

### साड्यांच्या चोरट्या निर्यातीची युक्ती

सोने, चांदी आणि परदेशी बनावटीच्या अनेक वस्तू चोरून भारतात आणण्यासाठी अनेक प्रकारच्या युक्त्या योजण्यात येतात. भारतांत तयार होणाऱ्या अनेक प्रकारच्या साड्या चोरट्या मार्गाने सीलोनला पाठविण्यात येतात आणि त्यासाठी योजण्यात येणारी युक्ती अगदी सोपी आहे. सीलोनमधील कापडाचे व्यापारी ह्या कामासाठी ५०० तरुणी राबवीत असतात. ह्या तरुणींची भारत आणि सीलोनच्या दरम्यान सारखी ये-जा सुरू असते. भारतामधील अत्यंत खर्चिक आणि अलीशान होटेल्समध्ये त्या राहतात. त्याचा सर्व खर्च सीलोनमधील कापड व्यापारी करतात. सीलोनला परत जाताना त्या कांचीपुरम आणि मणिपुरी पद्धतीच्या भारी साड्या घेऊन जातात आणि सीलोनहून परत येतांना तेथील रत्ने बरोबर आणतात.

### भारत रशियाला दरसाल १० हजार वॅगन्स पुरविणार

दरवर्षी रशियाला १०,००० रेल्वे वॅगन्स ह्याप्रमाणे आठ वर्षात ८०,००० रेल्वे वॅगन्स पुरविण्याचा करार होणार आहे. भिलाईच्या पोलाद कारखान्याचे ८० हजार टन पोलाद घेण्याचे रशियाने आधीच मान्य केले आहे. हिंदी इंजिनिअरिंगचा धंदा मंदीतून वर काढण्याचा हा प्रयत्न आहे.

### ब्रह्मचाऱ्यांचे संततिनियमन

संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करवून घेणारांना रोख पैसे मिळतात, त्याच्या आकर्षणाने कित्येक ब्रह्मचारीही शस्त्रक्रिया करवून घेत आहेत. तीनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे ते खुशाल लिहून देतात! ब्रह्मचाऱ्यांवर ही शस्त्रक्रिया करणे नियमास धरून नाही.

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

आमचे ग्राहक, आणि नाराज!

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान!

दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

## परदेशी भांडवल मिळविण्यासाठी धोरणात बदल हवा

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या विद्यमाने दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय व्यापार आणि विकास परिषद भरविण्यात आली होती. विकसनशीळ देशांना त्यांच्या विकासासाठी परदेशी भांडवलाची गरज अजून बरीच वर्षे लागणार आहे. पण परदेशी भांडवल आकर्षून घेण्यासारखी परिस्थिती मात्र तेथे नसते, अशी प्रगत देशांची तक्रार असते. ह्यासंबंधी परिषदेत एक अहवाल सादर करण्यात आला. अहवालात असे म्हटले आहे की विकसनशील देशांची आर्थिक भरभराट वेगाने होण्यासाठी परदेशी भांडवलाची अतिशय गरज आहे; नव्हे परदेशी भांडवलाशिवाय विकास साध्यच होणार नाही. म्हणून विकसनशील देशांनी परदेशी भांडवलाबाबतचे आपले धोरण ताठर ठेवून चालणार नाही. धोरणांत इष्ट ते बदल करण्याची तयारी त्यांनी ठेवली पाहिजे. परदेशी भांडवलाच्या सहकार्याने कारखाने उभारताना त्यांतील भागभांडवलांत स्थानिक भांडवलच अधिक असले पाहिजे असा आग्रह धरून चालणार नाही. असा आग्रह धरण्यात आला तर परदेशी भांडवल मिळण्याच्या कामी बिकट अडचणी उभ्या राहतील, इतकेच नव्हे तर तांत्रिक ज्ञान आणि कारभारविषयक कौशल्य ह्यांचीची प्राप्ती दुरापास्त होईल. तेव्हा विकसनशील देशांनी परदेशी भांडवलाबाबतचे नियम लवचिक ठेवावे. त्याचप्रमाणे परदेशी भांडवलाला अमुकच क्षेत्र खुले राहील; इतर क्षेत्रांत त्याला मज्जाव केला जाईल अशी प्रथाही घालून चालणार नाही. विकसनशील देशांनी अशा अटी घातल्या तर परदेशांतील खाजगी भांडवल आकर्षित होण्याची शक्यता आणखीच कमी होत जाईल.

## सोयाबीनची लागवड करण्याचा प्रयत्न

हिंदी लोकांच्या खाण्यापिण्याच्या पदार्थांत इतिहासकालात झालेले फेरबदल कोणी कथन केले तर तो एक मनोरंजक विषय ठरेल. अशा फेरबदलाचे उदाहरण म्हणून आहारात स्थान पटकावून बसलेल्या मिरचीचे देता येईल. मिरची हा पदार्थ भारतात पोर्तुगीजांनी आणला असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वाहतूक मोठ्या प्रमाणावर चाललेल्या विसाव्या शतकात नवनव्या पदार्थांची देवाणघेवाणच काय पण लागवडही होणे अपरिहार्यच आहे. भारत सरकारने चालू वर्षी २०० टन सोयाबीनची आयात करण्याचा विचार चालविला आहे. हिंदच्या हवामानात उगवून पक्व होणारे सोयाबीनचे बियाणे शोधून काढण्यासाठी इंडिअन कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल रिसर्च ह्या संघटनेला सूचनाही देण्यात आल्या आहेत. आंध्र राज्याने प्रायोगिक लागवडीसाठी सोयाबीनची मागणी मध्यवर्ती सरकारकडे केली आहे. उत्तर भारतात काही ठिकाणी सोयाबीनची लागवड करण्यातही आलेली आहे. दक्षिण भारतामधील आंध्र प्रदेश आणि इतर राज्ये ह्या भागांत सोयाबीनची लागवड यशस्वी होऊ शकेल असा अभिप्राय व्यक्त करण्यात आला आहे. आंध्र प्रदेशातील समुद्रकिनाऱ्यानजीकचा भाग सोडून इतर भाग त्याच्या लागवडीसाठी विशेष अनुकूल आहे. गेल्या वर्षी भारतात शेंगदाण्याचे अपुरे पीक आल्यामुळे वनस्पती तुपाच्या निर्मितीसाठी सोयाबीनची आयात करण्यात आली होती. सोयाबीनपासून औषधांच्या नीर्मितीसाठी लागणारी काही द्रव्ये मिळू शकतात. शिवाय त्यांपासून दूधही तयार करता येते. चीनमध्ये सोयाबीनच्या भाकरी लोकांच्या खाण्यात असतात.

## क्रीडासाहित्याची लाभदायक निर्यात

भारतात तयार करण्यात येणारे खेळाचे सामान चांगल्या दर्जाचे असल्यामुळे परदेशांत त्याला चांगली मागणी असते. खेळांसाठी लागणारे विविध प्रकारचे साहित्य भारत सुमारे ७० देशांत निर्यात करीत असतो. ह्या धंद्यातील वार्षिक उलाढाल ४ कोटी रुपयांची असून त्यातील चौथा हिस्सा परदेशांशी व्यापारांचा असतो. क्रीडासाहित्याच्या निर्यातीमुळे भारताला दरसाल १ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती होते. क्रिकेट ह्या खेळाची मातृभूमी ब्रिटन असला तरी तेथेसुद्धा इंग्लिश बनावटीच्या बॅट्स इतक्याच भारतीय बॅट्सही लोकप्रिय झाल्या आहेत. ब्रिटिश बनावटीच्या बॅटसपेक्षा हिंदच्या बॅट्स स्वस्त असतात. अर्थातच त्यांना मागणीही चांगली येते. दर्जाच्या दृष्टीने हिंदच्या बॅटस फारशा कमी पडतात असेही नाही. क्रिकेटच्या खेळासाठी लागणारा चेंडूही ब्रिटनप्रमाणे कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांत स्थान मिळवून राहिला आहे. भारतात तयार करण्यात आलेल्या हॉकीच्या काठ्याही हा खेळ खेळणाऱ्या देशांत बहुतेक लोकप्रिय झाल्या आहेत. हॉकीच्या खेळातील प्रमुख खेळाडू हिंदची हॉकी स्टिकच पसंत करतात. हॉकीच्या खेळातील हिंदचा चेंडू रोम आणि टोकिओ येथील ऑलिंपिक सामन्यांत वापरण्यात आला. बँकॉक येथील आशियाई सामन्यातही तोच वापरण्यात आला. बॅडमिंटन व टेनिस खेळण्यासाठी लागणाऱ्या रॅकेट्सही इतर अनेक प्रकारच्या खेळण्याच्या सामानाबरोबर भारतातून निर्यात करण्यात येतात.

## 'शुभमंगला'ची रंगीत तालीम

'उद्या माझ्या लग्नाचा मुहूर्त' ह्या विषयाची तयारी इंग्लंडमधील मुलींच्या एका शाळेतील १४ ते १५ वर्षे वयाच्या मुलींच्याकडून करून घेण्यात येत आहे. विवाहाच्या वेळेचा पोषाख, स्वागताची आणि पानसुपारीची व्यवस्था, निमंत्रणपत्रिका, इत्यादींचा समावेश त्यांच्या अभ्यासक्रमांत आहे; वैवाहिक जीवन सुखी कसे करावयाचे ह्याचेहि शिक्षण त्यात अंतर्भूत आहे. ह्या अभ्यासामुळे मुलींत जबाबदारीची जाणीव निर्माण होण्यास मदत होते, असा शाळेच्या चालकांचा अनुभव आहे.

SCG-1 HIN

# नहीं–
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

## सरदार
### सोडा वाटर
### यंत्रसामग्री

**यह यंत्रसामग्री** ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी **इसकी** कोई तुलना नहीं। भारत और पूरबी **देशों में हजारों की** संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, **क्लब**, अस्पताल, उपाहारगृह और न्यायालय आदि **में** ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे **काम** देते आये हैं।

**हर दिन** ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें **निर्माण** करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

**हमारे दूसरे निर्माण हैं**: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



डबल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना ३७६१०२


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.